# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

क.पुविमं/शाखा क/आवेदन/2874
पुणे 411005.
दिनांक–31/05/2024

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/विद्यालय,
जिल्हा–पुणे, अहमदनगर, सोलापूर.

विषय–जुलै–ऑगस्ट,2024 मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (इ.10 वी) पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत......

संदर्भ–जा.क.रा.मं./परीक्षा–3/2095 दि. 30/05/2024.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) मार्च 2024 परीक्षेचा निकाल दिनांक 27/05/2024 रोजी ऑनलाईन जाहीर झालेला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत पुरवणी परीक्षा जुलै 2024 मध्ये घेण्यात येणार आहे. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेस पुनर्परिक्षार्थी,यापुर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे विद्यार्थी ,**ITI** विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्यागिक प्रशिक्षण संस्थेद्वारे **Transfer of Credit** घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने इ.10 वी साठी **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणेः–

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळामार्फत पुनर्परिक्षार्थी,यापुर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी(परीक्षेस प्रविष्ठ न झालेले), श्रेणी सुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे , **ITI** विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (.औद्यागिक प्रशिक्षण संस्थेद्वारे **Transfer of Credit** घेणारे विद्यार्थी )ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | शुक्रवार,दि.31/05/2024 ते मंगळवार ,दि.11/06/2024 | शनिवार ,दिनांक 01/06/2024 ते बुधवार, दिनांक 19/06/2024 | शुक्रवार, दिनांक 21/06/2024 |
| विलंब शुल्क | बुधवार, दि.12/06/2024 ते सोमवार, दि.17/06/2024 | | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी जुलै–2024 मध्ये होणाऱ्या परीक्षेची आवेदन पत्रे त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फतच भरावीत.सर्व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

1. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना मार्च–एप्रिल 2024 परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.
2. उपरोक्त परीक्षेस प्रथमतः प्रविष्ठ झालेल्या व श्रेणी सुधार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार श्रेणीसुधार करू इच्छिणाऱ्या मार्च 2024 परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी जुलै,2024 व मार्च,2025 अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.
3. सर्व माध्यमिक शाळांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँक ऑफ इंडिया (**Virtual Account**) द्वारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करून चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच मंडळाकडे सादर कराव्यात.

4. नियमित शुल्कासह व विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावेत.

5. परीक्षा शुल्क **NEFT/RTGS** द्वारे भरणा केल्यानंतर सदर शुल्क पुनःश्च शाळेच्या खात्यावर जमा झालेले नाही ते मंडळाच्या खात्यावर वर्ग/जमा झालेले आहेत.याची अंतिमतः खात्री करावी.

6. आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखामध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

7. जुलै,2024 परीक्षेसाठी आवेदनपत्रे **Online** सादर केली आहेत, अशा पुनर्परिक्षार्थी/श्रेणीसुधार/आयसोलेटेड विद्यार्थ्यांच्या यापूर्वी प्रविष्ठ झालेल्या परीक्षांच्या गुणपत्रिकेची छायाप्रत साक्षांकित करून सादर करणे अनिवार्य आहे.सदर गुणपत्रिकेच्या वरील उजव्या कोपऱ्यात जुलै,2024 परीक्षेचा विद्यार्थ्यांचा आवेदनपत्र कमांक लाल शाईमध्ये नमूद करावा. सदर गुणपत्रिकेचा बंच तयार करून याद्या व चलने विभागीय मंडळास जमा करतेवेळी सादर करावा.

8. विद्यार्थ्यांच्या याद्या व चलने निर्धारित शुकवार दिनांक 21/06/2024 रोजी विभागीय मंडळ कार्यालय पुणे येथेच स्विकारले जातील याची नोंद घ्यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005.

प्रत

1. मा.शिक्षण उपसंचालक पुणे .माहितीसाठी तथा कार्यवाहीस्तव
2. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद पुणे, अहमदनगर, सोलापूर

सादर

१४८ prakatan

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५**

**माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा( इ. १० वी ) जुलै-२०२४ व त्यापुढील परीक्षेसाठी सुधारित दराचा परीक्षा शुल्क विवरण तक्ता**

परीक्षा शुल्काचे विवरण (लेखा -१)

सांकेतांक क्रमांक- एस....................

प्रति,

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५.

महोदय,

जुलै-२०२४/मार्च -२०२५ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा, गुणपत्रिका, प्रात्याक्षिक व विलंब शुल्काप्रित्यर्थ देय असलेली रक्कम रु- ............. /- चलन क्र..........................................
दिनांक: / /२०२४
बँक ऑफ इंडिया अन्वये सादरकरीत आहे.उपरोक्त रक्कमेचे विवरण खालीलप्रमाणे.

| प्र.क्र | तपशील | दर प्रती विद्यार्थी | विद्यार्थी संख्या | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | नियमित/पुर्नपरीक्षार्थी (REPETER/REGULAR CANDIDATE) प्रति विद्यार्थी | रू. ४७०/- | | |
| २ | खाजगी विद्यार्थी/पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी (PRIVATE/REGULAR/REPETER CANDIDATE) प्रति विद्यार्थी | रू. ४७०- | | |
| ३ | (ISOLATED) तुरळक विषय घेवून बसणारे विद्यार्थी,<br>१. एका विषयास<br>२. एका पेक्षा जास्त विषयास (प्रती विद्यार्थी)- संपूर्ण शुल्क<br>(जे विद्यार्थी यापूर्वी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाले आहेतत्याची नोंदकरण्यात यावी.) | रू. १२०/-<br>रू. ४८०/- | | |
| ४ | विज्ञान प्रात्याक्षिक परीक्षा (Science Practicals) | रू. १०/- | | |
| ५ | तंत्र प्रात्याक्षिक परीक्षा ( प्रती विद्यार्थी ) (Technical Practical) | रू. १००/- | | |
| ६ | गुणपत्रिका शुल्क ( प्रती विद्यार्थी ) ( लॅमिनेशनसहीत ) | रू. २०/- | | |
| ७ | प्रमाणपत्र शुल्क ( प्रती विद्यार्थी ) ( लॅमिनेशनसहीत ) | रू. २०/- | | |
| ८ | प्रशासकीय शुल्क ( प्रती आवेदनपत्र ) | रू. २०/- | | |
| ९ | श्रेणीनुसार योजनेअंतर्गत प्रविष्ट होणारे नियमित/पुर्नपरीक्षार्थी/खाजगी | रू.९३०/- | | |
| १० | विलंब शुल्क ( Late Fee ) ( प्रती विद्यार्थी ) | रू. २०/- | | |
| ११ | अतिविलंब शुल्क प्रती विद्यार्थी रु. ५०/- प्रमाणे कालावधी<br>दिनांक ..................... पासुन दिनांक ..................... पर्यंत<br>एकूण दिवस ..................... ५० | | | |
| १२ | विशेष अतिविलंब शुल्क प्रती दिन प्रती विद्यार्थी रु. १००/- प्रमाणे<br>कालावधी दिनांक ..................... पासुन दिनांक ..................... पर्यंत<br>एकूण दिवस ..................... १०० | | | |
| १३ | अतिविशेष अतिविलंब शुल्क प्रती दिन प्रती विद्यार्थी रू. २००/- प्रमाणे<br>कालावधी दिनांक ................ पासून दिनांक ................... पर्यंत<br>एकूण दिवस .................... २०० | | | |
| | एकूण:- | | | |

मुख्याध्यापकाची स्वाक्षरी व शिक्का